# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १५.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १४/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४६,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे. **अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १४/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०४ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१४/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन वसमत शहर ०७,औंढा ना.०१,हिंगोली ग्रा.०१ असे एकुण येथे ०९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ३४.५६ लिटर दारू असा एकुण १४,६७०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अपघात** :—दिनांक १४/०८/२०२२ रोजी फिर्यादी नितीन उत्तमराव कोरडे व्य. खाजगी नौकरी व शेती रा माळहिवरा ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा.येथे २७९,३३८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०१.०२.२२ रोजी चे १८:१५ वा चे सुमारास हिंगोली ते वाशिम जाणा—या रोडवर कलगाव पाटी जवळ फिर्यादी हा लघवी करण्या करीता रोडचे डाव्या बाजुला उभा असतांना यातील नमुद महींद्रा मॅग्झीमो क्र एमएच २० सीएस ३०३७ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस धडक दिल्याने फिर्यादीचे उजव्या पायाचे मांडीवर त्या वाहनाचे चाक लागुन व पल्टी झाल्याने उजव्या पाय मांडी पासुन मोडला तसेच डावे खांदयास मार लागुन हाड मोडले आहे डावे पायाचे गुढघ्यास डाव्या हातास खरचटुन मुक्का मार लागला आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.